कोकणसाद
www.kokansad.com
गुरुवार दि. २८ एप्रिल २०२२



# हळबे महाविद्यालयात शुक्रवारी आरोग्यसंपन्न सकस आहारावरील कार्यशाळेचे आयोजन

कोकणसाद वृत्तसेवा

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील 'हॉटेल मॅनेजमेंट' या विभागातर्फे एकदिवसीय 'आरोग्यसंपन्न व सकस आहार' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा शुक्रवार दि. २९ एप्रिलला दुपारी ३ वाजता हळबे महाविद्यालय, दोडामार्ग येथे संपन्न होणार आहे.

आजचे धकाधकीचे व धावपळीचे जीवन त्याचबरोबर खाद्यपदार्थांवर वापरण्यात येणारी रसायने व त्यामुळे उद्भवणारे आजार तसेच 'फास्ट फुड' कडे मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग झुकत आहे. तेच खाद्य-प्रदार्थ आपण घरच्या घरी कसे रुचकर व घरच्या साहित्यापासून बनवू शकतो, याचे मार्गदर्शन या कार्यशाळेत करण्यात येणार आहे.

योग्य व अयोग्य आहार कोणता ? आहाराच्या वेळा व इतर आहारासंदर्भातील अनेक विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक केले जाणार आहे. या कार्यशाळेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्या-लयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व 'हॉटेल मॅनेजमेंट' विभागाचे प्रा. गौरिश कर्पे यांनी केले आहे.

या कार्यशाळेसाठी नावनोंदणी सुरु झाली आहे. त्यासाठी ७७९६२७१६६३ या मोबाईलवर कॉल करून आपली जागा निश्चित करा. या कार्यशाळेत मर्यादित जागा उपलब्ध आहेत याची नोंद इच्छुकांनी घ्यायची आहे.